# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 06 January 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०६ जानेवारी २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- भारत लवकरच जगातली तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनेल – पंतप्रधानांना विश्वास
- येत्या पाच वर्षात राज्यात दहा हजार सहकारी संस्था उभारण्याचं धोरण – सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची माहिती
- बीड जिल्ह्यातल्या हत्या प्रकरणाचं राजकारण न करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आवाहन, तर या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर चार अधिकाऱ्यांच्या बदल्या

आणि

- साहित्य अकादमी पुरस्कार विजेते डॉ सुधीर रसाळ यांचा मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीनं सत्कार

****

भारत लवकरच जगातली तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनेल, असा विश्वास, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. राजधानी दिल्लीत काल रेल्वे, मेट्रो आणि आरोग्याशी संबंधित १२ हजार २०० कोटी रुपयांच्या योजनांचं उद्घाटन आणि लोकार्पण पंतप्रधानांच्या हस्ते झालं, त्यानिमत्तानं रोहिणी इथं झालेल्या कार्यक्रमाला ते संबोधित करत होते. येत्या २५ वर्षांत भारत विकसित देश झालेला आपण पाहू आणि दिल्लीला या विकसित देशाची राजधानी म्हणून अधिक विकसित करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला. ते म्हणाले,

> ***‘‘अब आनेवाले पच्चीस साल भारत के भविष्य के लिये, दिल्ली के भविष्य के लिये बहोत ही महत्वपूर्ण है। ये पच्चीस साल भारत को विकसित राष्ट्र बनते हुये देखेंगे। ये भारत को आधुनिकता के एक नये दौर***

***से गुजरते हुये देखेंगे। जब भारत दुनिया की तिसरी बडी आर्थिक ताकत बनेगा।''***

****

राज्यात नव्यानं मोठी सहकार चळवळ उभी करण्याची गरज असून, येत्या पाच वर्षात १० हजार सहकारी संस्था उभारण्याचं राज्य सरकारचं धोरण असल्याचं, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी म्हटलं आहे. ते काल सोलापूर इथं बोलत होते. सहकारी संस्थाना पतपुरवठा करणं आणि वसुली करणं या पलीकडे जाऊन त्यांना सहकारी तत्वावर वेगवेगळे उद्योग करण्याची परवानगी दिली जाईल, असं ते म्हणाले. सहकारी दूधसंघात अध्यक्ष आणि राजकारणी लोकांनी केलेल्या आर्थिक घोटाळ्यांमुळे हे क्षेत्र अडचणीत आलं आहे, सहकारी चळवळ टिकवायची आणि वाढवायची असेल तर कायद्यात सुसूत्रता आणून कठोर भूमिका घेणं आवश्यक असल्याचं मत पाटील यांनी व्यक्त केलं.

****

पायाभूत सुविधा विकासात महाराष्ट्र आता भारतात पहिल्या क्रमांकावर असल्याचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. नागपूर इथं काल राज्यातल्या विविध ठिकाणी महारेलने उभारलेल्या सात उड्डाणपुलांच्या लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते. येत्या काळात महारेल मार्फत २०० रेल्वे उड्डाणपूल आणि भुयारी मार्गाची कामं पूर्ण केली जात आहेत, मेट्रो, राष्ट्रीय महामार्ग, राज्य मार्ग, विमानतळ विकास, बंदरांचा विकास अशा सर्व क्षेत्रात राज्यात आपण दूरदृष्टी ठेवून विकास कामं हाती घेतल्याचं फडणवीस म्हणाले.

***"गेल्या दहा वर्षामध्ये महाराष्ट्रामध्ये जी इन्फ्रास्ट्रक्चरची कामं झाली आहेत, ती अभूतपूर्व अशा प्रकारची कामं आहेत. आज देशामध्ये जेवढे इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट चालले आहेत, त्यांच्यामध्ये सर्वात जास्त इन्फ्रास्ट्रक्चरची प्रोजेक्ट जर कुठे चालले असतील, तर ते महाराष्ट्रामध्ये चाललेले आहेत, हे सांगताना मला अतिशय आनंद वाटतो. ते मेट्रोचे असो, रस्त्यांचे असो, ते हायवेजचे असो, ते एयरपोर्टचे असो, ते पोर्ट चे असो, सगळ्या प्रकारची इन्फ्रास्ट्रक्चरची कामं ही महाराष्ट्रामध्ये अत्यंत वेगाने चाललेल आहेत, आणि अजून खूप कामं आपल्याला करायची आहेत.''***

महारेल या कंपनीला दिलेली कामं त्यांनी कमी कालावधीत गुणवत्तापूर्ण ऊभारुन एक नवा मापदंड निर्माण केला असल्याचं फडणवीस यांनी नमूद केलं.

****

दरम्यान, नागपूर इथं वार्ताहरांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी, बीड जिल्ह्यात मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात सरकार आणि पोलीस संपूर्ण ताकदीनं कारवाई करत आहेत, जे दोषी आहेत, त्या कोणालाही सोडणार नाही, अशी ग्वाही दिली. या प्रकरणी नीट तपास आणि चौकशी होऊ द्यावी, याचा उपयोग निव्वळ राजकारणासाठी करु नये, असं मुख्यमंत्री म्हणाले.

***''बीडच्या प्रकरणामध्ये सरकार आणि पोलीस पूर्ण शक्तीनी त्याठिकाणी कारवाई करतायत. निर्धाराने कारवाई होतेय. या प्रकरणामध्ये काहीही झालं, तरी कोणालाही वाचवण्याचा कोणीही प्रयत्न केला तरी आम्ही वाचवू देणार नाही, जे जे दोषी आहेत. आणि या प्रकरणाच्या अनुषंगाने जे लोकं दादागिरी करतात, जे लोकं हप्ते वसुली करतात, अशा सर्वांवर जरब बसवायचा असं आम्ही ठरवलेलं आहे. त्यामुळे यासंदर्भातली योग्य कारवाई चाललेली आहे. त्या हत्येचा उपयोग हा राजकारणाकरता होऊ नये तर त्यातनं समाजामध्ये काहीतरी सुधार व्हावा असा आमचा प्रयास आहे.''***

****

बीड जिल्ह्यातील हत्या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी चार अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. यात सक्तीच्या रजेवर पाठवलेल्या प्रशांत महाजन यांचाही समावेश आहे. आता पोलीस निरीक्षक वैभव पाटील हे केज पोलीस स्टेशनचे प्रभारी म्हणून काम पाहणार आहेत.

****

संतोष देशमुख हत्येप्रकरणी पुण्यात काल जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. देशमुख यांच्या मारेकऱ्याला फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी करत हजारो नागरिक या मोर्चात सहभागी झाले होते. यावेळी संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांसह, कॉंग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण, खासदार बजरंग सोनावणे, भाजपचे सुरेश धस, मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे-पाटील सहभागी झाले होते.

दरम्यान, खासदार बजरंग सोनवणे, आमदार सुरेश धस, आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासह मनोज जरांगे, अंजली दमानिया यांच्यावर समाज विघातक कृत्य

अधिनियमानुसार गुन्हे दाखल करण्याची मागणी बीड इथल्या नागरीकांनी केली आहे.

****

भारतीय जनता पक्षाकडून संगठन पर्व सदस्य नोंदणी महाभियान काल राज्यभर राबवण्यात आलं. नागपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रेशीमबाग इथल्या महात्मा फुले सभागृहात, सदस्यता नोंदणी अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. धाराशिव जिल्ह्यातल्या उमरगा इथं माजी मंत्री बसवराज पाटील यांनी भाजप सदस्यत्व नोंदणीचा शुभारंभ केला.

****

साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांचा काल छत्रपती संभाजीनगर इथं मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी मसापचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील, ज्येष्ठ समीक्षक डॉ. चंद्रकांत पाटील, सुमती रसाळ, डॉ. दादा गोरे, उपस्थित होते. तर्कशुद्ध मांडणी हे रसाळ सरांच्या लेखनाचं वैशिष्ट्य असल्याचं मत, चंद्रकांत पाटील यांनी यावेळी व्यक्त केलं. ज्ञानाच्या क्षेत्रात उणिवा दाखवणं हेच मोठं काम असून, त्या स्वीकारता आल्या पाहिजे, असं रसाळ यांनी सत्काराला उत्तर देताना नमूद केलं.

****

बीड जिल्ह्यातल्या ग्रामीण भागात वैयक्तिक नागरी स्वच्छता आणि आरोग्य बळकटीकरणासाठी घनकचरा आणि सांडपाणी व्यवस्थापनातलं उत्कृष्ट कुटुंब, ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. जिल्ह्यात प्रत्येक कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालय, शोषखड्डा, खत खड्डा तसंच कचरा वर्गीकरणासाठी हिरव्या आणि निळ्या रंगाच्या दोन कचराकुंड्या असणारं कुटुंब यासाठी पात्र असून, २६ जानेवारी रोजी अशा कुटुंबांना सन्मानित करण्यात येणार आहे. या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातले सुमारे चार लाख ७२ हजार ३७९ कुटुंब सहभागी होणार आहेत.

****

सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव योजनेचा लाभ मिळावा यासाठी सोयाबीन खरेदीला ४५ दिवसांची मुदत वाढ देण्यात यावी अशी मागणी तुळजापूरचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी पणन मंत्री जयकुमार रावल यांच्याकडे केली आहे. आमदार पाटील यांनी काल यासंदर्भात माहिती दिली. सुरुवातीला आर्द्रता आणि

त्यानंतर बारदाण्याच्या तुटवड्यामुळे अनेक शेतकरी बांधवांना हमीभाव खरेदी केंद्रांवर सोयाबीन घालता आलेलं नाही, याकडे रावल यांचं लक्ष वेधल्याचं त्यांनी सांगितलं.

****

नांदेड जिल्ह्यात माळेगाव यात्रेतल्या विविध स्पर्धांचं बक्षिस वितरण काल आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या हस्ते झालं. माळेगाव यात्रा ही केवळ उत्सव नसून शेतकऱ्यांच्या परिश्रमांचा सन्मान करण्याचं व्यासपीठ असल्याचं, ते यावेळी म्हणाले.

दरम्यान, स्पर्धांच्या काल शेवटच्या दिवशी कुस्त्यांचा फड आणि अश्व शर्यत पार पडली. यासोबतच शासकीय कार्यक्रमांचाही काल समारोप झाला.

****

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांच्या लेखी परीक्षा सात ते २३ जानेवारी दरम्यान होणार आहेत. शैक्षणिक वर्ष २०२४ – २५ च्या हिवाळी सत्रातल्या प्रवेशित नियमित विद्यार्थांची सत्र परीक्षा आणि मे २०२४ परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांची ही परीक्षा आहे. राज्यातल्या विविध २३५ केंद्रांवर ही परीक्षा होणार आहे.

****

परभणी जिल्ह्यात जिंतूर तालुक्यातल्या वस्सा इथं 'उमेद' महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाअंतर्गत जागृती महिला प्रभाग संघाची आमसभा काल पार पडली. यावेळी महिला बचत गटाच्या उत्पादित मालाला हक्काचं विक्री केंद्र मिळावं यासाठी जागृती विक्री केंद्राचं उद्घाटन, जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक रश्मी खांडेकर यांच्या हस्ते झालं.

****

परभणी जिल्ह्यातले पाणंद, शेतरस्ते, शिवार रस्ते खुले करण्यासाठी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी आजपासून १८ फेब्रुवारी पर्यंत मोहीम राबवण्याचे आदेश जारी केले आहेत. यामुळे शेतीचे अनेक प्रश्न मार्गी लागतील, अशी माहिती त्यांनी दिली.

****

दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने संक्रांतीच्या सणानिमित्त प्रवाशांची होणारी गर्दी लक्षात घेता काही विशेष गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे.

काकीनाडा – नांदेड विशेष रेल्वे आज आणि १३ जानेवारीला दुपारी दोन वाजून २५ मिनिटांनी नांदेड इथून सटेल.

****